१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण या योजनेंतर्गत जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग (सिंधुदूर्गनगरी) येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती/ नुतनीकरणास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण १२१६/९८९/प्र.क्र.१९२/कार्या.११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ मे, २०१८

<u>वाचा</u> : १.प्रबंधक (निरिक्षणे २), उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. क्र.B(W)६०४९/२०१०/१९२३/१७१७०, दि.२१/७/२०१६ व क्र.B(W)६०४९/२०१०/२९१७/२६६७७/१६ दि.१९/११/२०१६,
२. जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग यांचे पत्र क्र. Admn/१६९३/२०१६, दि.५/७/२०१६, क्र.Admn/२४४५/२०१६, दि.७/१०/२०१६,
३. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्र.चौविआ १२१६/प्र.क्र.१०७/कार्या.९, दि.१०/११/२०१६.
४. शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्र.चौविआ १२१६/प्र.क्र.१०/कार्या.९, दि.१२/१/२०१८

<u>प्रस्तावना:</u>

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाने शिफारस केलेल्या "न्याय व्यवस्थेचे सक्षमीकरण" (Strengthening the Justice) या प्रयोजनासाठी सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या ५ वर्षाच्या कालावधीकरीता महाराष्ट्र राज्यासाठी रुपये १०१४ कोटी इतक्या निधीची शिफारस केली आहे. १४ व्या वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण या घटकासाठी ५ वर्षाच्या कालावधीकरीता रु.२२८ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. १४ व्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींची कार्यक्षम अंमलबजावणी करण्यासाठी दि.९/३/२०१६ रोजी उच्चस्तरीय संनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीच्या दि.२८/३/२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मा.उच्च न्यायालयाकडुन प्राप्त झालेल्या कृती आराखड्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. या बैठकीचे इतिवृत्त दि.१६/०५/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले. त्यामध्ये न्यायालयाच्या नुतनीकरणाच्या ज्या प्रस्तावाची किंमत रु.५० लक्षपेक्षा अधिक असेल असे प्रस्ताव मान्यतेसाठी उच्चस्तरीय संनियंत्रण समितीसमोर सादर करण्याचे ठरले. मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तपासणीअंती ज्या प्रस्तावाची किंमत रु.५० लक्षपेक्षा अधिक आहे, असे ९१ प्रस्ताव उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या मान्यतेसाठी सादर केले असता त्यावर चर्चा होऊन सदर प्रस्तावास उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या दि.८/१२/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने विधि व न्याय विभागास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार दि.१२/१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्व्ये प्रदान करण्यात आले आहेत. तसेच सदर९१ प्रस्तावाच्या प्रशासकीय मान्यतेस मा.मुख्यमंत्री महोदय यांची मान्यता घेण्यात आली आहे.

सदर ९१ प्रस्तावात जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग (सिंधुदूर्गनगरी) येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती / नुतनीकरणाचा प्रस्ताव समावेश करण्यात आला आहे. उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये सन २०१६-२०१७ च्या दरसूचीवर आधारीत जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग (सिंधुदूर्गनगरी) येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती / नुतनीकरणाचे प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाले आहेत. त्याबाबतची अंदाजपत्रके संबंधित उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, कणकवली जि.सिंधुदूर्ग यांनी तयार केली असून संबंधित कार्यकारी अभियंता तसेच प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग यांनी साक्षांकित केली आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

यांनी सदर अंदाजपत्रक तपासून प्रशासकीय मान्यतेस सहमती दर्शविली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण या योजनेअंतर्गत जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग, (सिंधुदूर्गनगरी) येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती /नुतनीकरणासाठी येणाऱ्या रुपये २,१८,०२,११८/- (अक्षरी रुपये दोन कोटी, अठरा लाख दोन हजार एकशे अठरा फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग, (सिंधुदूर्गनगरी) येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती/ नुतनीकरणाच्या कामाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	मा.उच्च न्यायालयाच्या पत्राचा दिनांक	न्यायालयीन इमारत	कामाचे स्वरुप	अंदाजपत्रकीय किंमत (रुपये)	सा.बां.विभागाने परिगणित केलेली रक्कम (रुपये)
१	२१/७/२०१६	सिंधुदुर्ग (सिंधुदुर्गनगरी)	Brialle Symbol and auditory signals in toilet block	४,३८,९००/-	४,३६,०००/-
			Construction of closed cubical for accused have one way glass	३,२९,१७५/-	३,२७,०००/-
			Making arrangement that the accused and vulnerable witness shall not come face to face	११,०५,३०९/-	१०,९८,००६/-
			Barrier free Court and Court room for person disabilities by providing handicap ramp	५,२५,५८०/-	५,०७,५९३/-
			Handicap ramp in District Court campus from ground to first floor	१९,७३,५७७/-	१९,०४,६५८/-
			Adaption of toilet for wheel chair user	४,८०,९००/-	४,५६,०००/-
			Establishing vulnerable witness deposition centre by making waiting room	५,१८,२९२/-	५,१३,०१०/-
			Sanitation facility	४,८६,९९४/-	४,८३,७७७/-
			Making witness box adaptable to wheel chairs	३,५१,१२०/-	३,४८,८००/-
	१९/११/२०१६		Providing precoated sheets roofing over existing RCC slab	८२,६८,५६८/-	८७,१८,५५८/-
			Plastering & Painting work	२२,४१,९१७/-	२३,०८,९८२/-
			Anti termite treatment	२,६९,९३४/-	२,८४,६९५/-
			Electrical Installation	३९,९२,७३२/-	४४,१५,०३९/-
एकूण				**२,०९,८२,९९८/-**	**२,१८,०२,११८/-**

३. जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग (सिंधुदूर्गनगरी) येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती/ नुतनीकरणासाठी येणारा खर्च "मागणी क्र.जे-१, २०१४ न्यायदान १०२- उच्च न्यायालये, (११) कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण, (११) (०१) कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण (२०१४ ०५४८) या लेखाशीर्षाखालील मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर कामाची निविदा मागविण्यापूर्वी उपरोक्त कामे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या Dedicated Cell ने निश्चित केलेल्या कामामधीलच असल्याची खातरजमा करण्याची तसेच सदर अंदाजपत्रक सक्षम अधिकाऱ्यांकडून साक्षांकित करण्याची जबाबदारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय,सिंधुदूर्ग यांची राहील. प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रक्रिया कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिंधुदूर्ग यांच्याकडून राबविण्यात यावी व या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने इतर अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करावी.

५. हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.सं.क्र.४५१/इमा.२, दि.२५/१०/२०१६ व अनौ.सं.क्र.४१२/इमा.२, दि.२४/४/२०१७ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने तसेच शासन निर्णय विधि व न्याय विभाग,क्र.चौविआ १२१६/प्र.क्र.१०/का.नऊ, दि.१२/१/२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५२३१६१५११९४१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2018.05.23 16:13:56 +05'30'

(सं.सं.नवगिरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
२) प्रबंधक (निरिक्षणे २), मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
३) प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश,सिंधुदूर्ग
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई,
५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
६) जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदूर्ग
७) उप जिल्हा कोषागार अधिकारी,सिंधुदूर्ग
८) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
९) सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई,
१०) विधि व न्याय विभाग (का.९/२३), मंत्रालय, मुंबई,
११) निवडनस्ती (कार्यासन ११)